गुरुवार
०४.०८.२०२२

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक

जालना
लातूर
अहमदनगर
यवतमाळ

# स्वातंत्र्यलढ्यावर आधारित अनेक कादंबऱ्यांची दखल मराठी वाङमय इतिहासात घेतली गेली नाही!-सतीश बडवे

**बाबा अडसूळ**-स्वातंत्र्यलढ्यावर आधारित अनेक कादंबर्यांची दखल मराठी वाङमय इतिहासात घेतली गेली नाही. काही ठराविक कादंबर्यांचीच चर्चा होते परंतु स्वातंत्र्य चळवळीत काम करणारी अनेक भूमिगत माणसं होती.ज्यांच्या धगधगत्या आयुष्यावर काही लेखन झालं पण दुर्दैवाने वाङमयाच्या इतिहासात त्याची नोंद घेतली गेली नाही.' ते प्रतिष्ठान महाविद्यालयात संपन्न झालेल्या साहित्य अकादमी आयोजित चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी मंचावर साहित्य अकादमीच्या मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक रंगनाथ पठारे आणि साहित्य अकादमी चे कार्यक्रमाधिकारी ओम प्रकाश नागर यांची उपस्थिती होती.
कै. भाऊराव पाटील शिसोदे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून साहित्य अकादमीचे



'भारतीय स्वातंत्र्य आंदोलन आणि मराठी साहित्य' या विषयावरील दोन दिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्घाटन कौतिकराव ठाले पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र पाटील शिसोदे, सचिव राजेंद्र पाटील शिसोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. बीजभाषण एकनाथ पगार यांनी केले. दोन दिनसापासून संपन्न झालेल्या चार सत्रात अनेक मान्यवर लेखकांनी विचार मांडले.

त्यात अकादमीच्या मराठी सल्लागार मंडळाचे सदस्य राजन गवस, सुमती लांडे, जयदेव डोळे, दिलीप चव्हाण, विनोद सिरसाट, गणेश चंदनशिवे, सुशिल धसकटे, गणेश मोहिते, समिता जाधव, विनायक येवले, रवि कोरडे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.जी.सोनकांबळे, उपप्राचार्य प्रकाश तुरुकमाने, सर्जेराव जिगे, मधुकर बैकरे, हंसराज जाधव,
अशोक खोडके, एम.ए. करे, दिपक भुसारे, सुधीर नलभे, रविचंद्र अंधोरीकर, अरुण बागूल, हिवराळे, रुपेकर, तडवी,बागूल यांनी प्रयत्न केले.